**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.२९ मे ते २ जुन २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.**
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र
मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३४ ■ गुरुवार २८ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.NO./DHL/53/24-26



घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल®
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

## निवडणूक आयोगाची एस.आय.आर. मोहिम वैध सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे सर्वत्र खळबळ



**नवी दिल्ली, दि.२७- पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीदरम्यान अत्यंत वादग्रस्त आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील ठरलेल्या निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (स्पेशल इन्टेंसिव्ह रिव्हीजन अर्थात एसआयआर) मोहिमेवर सर्वोच्च न्यायालयाने आज, बुधवारी दि.२७ मे २०२६ अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही मोहीम पूर्णपणे वैध असल्याचा निर्वाळा दिला असून, निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या याचिका फेटाळून लावल्या आहेत.**

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने हा निकाल सुनावताना स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाने मोहीम राबवताना आपल्या कायदेशीर आणि घटनात्मक अधिकारांचाच वापर केला आहे. आयोगाने आपल्या अधिकाराच्या कक्षेबाहेर जाऊन कोणतीही कारवाई केलेली नाही, त्यामुळे ही मोहीम असंवैधानिक ठरवता येणार नाही.

**निवडणूक आयोगाला संविधानाने अधिकार दिले: सर्वोच्च न्यायालय**

सर्वोच्च न्यायालयाने याचिकांवर दीर्घ सुनावणी पूर्ण झाल्यानंतर यापूर्वी आपला निर्णय राखून ठेवला होता. आज निकाल देताना खंडपीठाने निवडणूक आयोगाच्या बाजूने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

**लोकप्रतिनिधी कायदा १९५० चा आधार**

मतदार याद्यांचा फेरआढावा घेणे, विशेष मतदार यादीचे पुनर्निरीक्षण करणे आणि सर्व मतदार याद्यांचे पुनरावलोकन करण्याचे पूर्ण अधिकार निवडणूक आयोगाला लोकप्रतिनिधी कायदा १९५० नुसार आहेत.

**घटनेचे कलम**

संविधानातील निवडणूक आयोगाशी संबंधित अनुच्छेदांमध्ये (कलमांमध्ये) स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, निवडणूक आयोग देशातील मतदार याद्या तयार करेल आणि त्यांची फेररचना करेल. त्यामुळे आयोगाच्या या प्रक्रियेला चुकीचे किंवा बेकायदेशीर ठरवता येणार नाही. **(पान ४ वर)**

## ब्रह्मपुरीत राज्यातील उच्चांकी तापमान

नागपूर, दि.२७- विदर्भात यंदाच्या उन्हाळ्याने रौद्ररूप धारण केले असून संपूर्ण परिसर अक्षरशः होरपळून निघाला आहे. सूर्याच्या प्रचंड कोपामुळे नागरिक त्रस्त झाले असून विदर्भातील उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. मंगळवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत ब्रह्मपुरी येथे तब्बल ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, हे या हंगामातील राज्यातील सर्वोच्च तापमान ठरले आहे. पुढील २४ तासांत ही लाट आणखी तीव्र होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला असून नागरिकांना घराबाहेर पडताना अत्यंत काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भातील हवामान येत्या काही दिवसांत अधिक खालावण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर या तीन जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी **(पान ४ वर)**

## धुळे जिल्ह्यात मतदार याद्यांचे होणार विशेष सखोल पुनरीक्षण - जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

**धुळे, दि. २७ - भारतीय संविधानातील कलम ३२४ व ३२६ तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियमातील तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाने २४ जून २०२५ रोजी मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण करण्याचे आदेश जारी केले आहेत. जिल्ह्यातील १८ लाख ५२ हजार ५४८ मतदारांच्या नोंदीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून ही प्रकिया जून ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिली आहे.**



मागील अनेक वर्षात राज्यात केवळ संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमा राबविण्यात आलेल्या आहेत. वाढते शहरीकरण, स्थलांतर तसेच मतदार याद्यांमधील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे किंवा चुकीच्या नोंदी यामुळे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येणारी मोहीम व कालावधी असा : १) विशेष सखोल पुनरीक्षणासाठी अर्हता- १ ऑक्टोबर २०२६, २) तयारी, प्रशिक्षण व छपाई- २० ते २९ जून २०२६, ३) मतदारांच्या घरी मतदार केंद्रस्तरीय अधिकारी भेट देवून गणना अर्ज वाटप करणे व भरलेले अर्ज परत घेणे- ३० जून ते २९ जुलै २०२६, ४) मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण- २९ जुलै २०२६ पर्यंत, ५) प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी- ५ ऑगस्ट २०२६, ६) प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदविणे- ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६, ७) दावे व हरकती निकाली काढणे- ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, ८) अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी- ७ ऑक्टोबर २०२६.

या मोहिमेसाठी धुळे जिल्ह्यात एक हजार ७५२ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून ते ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देवून पूर्ण भरलेले गणना पत्रक मतदारांना वितरीत करतील आणि भरलेले अर्ज पुन्हा संकलित करतील. या प्रपत्रात मतदाराची सध्याची माहिती **(पान ४ वर)**

## बकरी ईदसाठी मुस्लीम बांधवांची जय्यत तयारी

धुळे, दि.२७- शहरासह जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांनी बकरी ईद साजरी करण्यासाठी जय्यत तयारी केली आहे. पांझरा नदी किनारी असलेल्या इदगाह मैदानसह सर्व मशिदींमध्यें दिलेल्या वेळेत नमाज अदा केली जाणार आहे.

नमाज पठणासाठी मुस्लीम बांधवांना अडचणी येवू नयेत, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे. सर्वधर्मसमभाव, प्रेम, आपुलकीचा संदेश बकरी ईदच्या माध्यमातून देण्यात येतो. मुस्लीम भागात पाणी पुरवठा तसेच पथदिव्यांची समस्या सोडविण्यासाठी **(पान ४ वर)**

## एसी सरकारला मानणाऱ्यांनी शिंदखेडा तालुक्यामध्ये एस.आय.आर.च्या घरगणना कामाला लावली मोगरी

**धुळे, दि.२७ - ''सन सोळाशे एसी सरकार'' या नावाने राज्यात आम्ही कसे वेगळे आहोत हे सांगत विरोध करणाऱ्या शिंदखेडा तालुक्यातील सतारे गावातील एसी सरकारचे सदस्य असणाऱ्या आदिवासी बांधवांनी एस आय आर च्या प्रथम सुरू असलेल्या घरगणनेच्या कार्यक्रमास विरोध केला आहे. यामुळे तब्बल दहा दिवसापासून एस आय आर चे कामकाज होत नसल्याचा प्रकार पुढे आलाय आहे. एसी सरकारच्या सदस्यांच्या म्हणण्यानुसार आमची नावे नोंदवायची असल्यास ती आमच्या पद्धतीनेच नोंदवली गेली पाहिजे असे त्यांचे म्हणणे असल्याची समजते.मात्र सरकारने तयार केलेल्या प मध्ये एवढ्या मोठ्या नावाची (जास्त अक्षरांची) नोंदणी करणे शक्य नसल्याने मोठी अडचण तयार झाली आहे. या सर्व परिस्थितीवर मुख्य एस आय आर अधिकारी तथा जिल्हाधिकारी कसा प्रश्न मार्गी लावतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.**

शिंदखेडा तालुक्यातील सतारे या वाडीशेवाडी प्रकल्पाजवळ असणाऱ्या गावाची लोकसंख्या ही १७०० ते १८०० आहे.तीन आदिवासी प्रभाग असणाऱ्या या गावात ५५० आदिवासींची लोकसंख्या आहे.यातील बहुतांश आदिवासी हे एसी सरकारला मानणारे आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील काही ठिकाणी एसी सरकारला मानणारे लोक राहतात.त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांचे सरकार वेगळे आहे.अशा परिस्थितीत एस आय आर चे काम सुरू झाले आहे. याच कामातील पहिला टप्पा म्हणजे घरगणना सुरू आहे. घरगणेला त्यांनी विरोध **(पान ४ वर)**

## शिरपूर फर्स्ट संघटना
## वाय वन कापसाचा काळाबाजार थांबवा

शिरपूर, दि.२७(का.प्र.)- शिरपूर तालुक्यात देशी कापूस वाण वाय वन या बियाण्यांचा काळाबाजार झाला असून शेतकऱ्यांची आर्थिक लूट झाली आहे. या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सार्वजनिक करावा आणि दोषींवर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा शिरपूर फर्स्ट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

शिरपूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले. त्यात म्हटल्यानुसार, वाय वन बियाण्याच्या एका पाकिटाची अधिकृत किंमत **(पान ४ वर)**

## बड्या कंपन्याकडे खंडणीची मागणी काम ठप्प- पो.अधिक्षकांनी लक्ष घालावे

**पिंपळनेर, दि.२७ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यात खंडणीखोरांचा हैदोस झाला असून टोळक्याने ट्रान्समिशन कंपनीला खंडणी द्या,नाहीतर प्रकल्प बंद करा असे धमकावले. दरम्यान अधिकारी-कामगारांना बेदम मारहाण केल्याने भीतीपोटी कर्मचारी गावाकडे पळाल्याची घटना घडली आहे. परिणामी दोन महिन्यांपासून कोट्यवधींचा प्रकल्प ठप्प झाला आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

साक्री तालुक्यातील म्हसदी शिवारात सुरू असलेल्या एका मोठ्या विकास प्रकल्पाला स्थानिक खंडणीखोरांच्या दहशतीचे ग्रहण लागले आहे. डीपीटीएल अंतर्गत उभारण्यात येत असलेल्या पावर ट्रान्समिशन लिमिटेड कंपनीच्या प्रकल्पावर एका टोळक्याने थेट धाड टाकत संपूर्ण परिसरात दहशत निर्माण केली. प्रकल्प सुरू ठेवायचा असेल तर आम्हाला नियमित खंडणी द्यावी लागेल,अशी उघड धमकी देत या टोळक्याने कंपनीतील अधिकारी, अभियंते आणि कामगारांना बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर, कार्यालयाला चक्क कुलूप ठोकून संपूर्ण प्रकल्पच बंद पाडला आहे.या धक्कादायक प्रकारामुळे साक्री तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

**दोन दिवस सलग थरार कार्यालयाची तोडफोड, हल्ला**

मिळालेल्या माहितीनुसार,ही थरारक घटना ३० एप्रिल रोजी सायंकाळी घडली. तीन अज्ञात इसम कंपनीच्या प्रकल्प कार्यालयात बेकायदेशीरपणे घुसले. त्यांनी तेथे उपस्थित असलेले कार्यकारी अभियंता तन्मय दत्ता यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांना अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. परिसरात दहशत माजवत या खंडणीखोरांनी कंपनीच्या चाव्या जबरदस्तीने हिसकावून घेतल्या आणि कार्यालयाला टाळे ठोकले.आमचे पैसे मिळाल्याशिवाय प्रकल्पाचे एकही काम सुरू होणार नाही, असा दम भरत ते निघून गेले.हा प्रकार **(पान ४ वर)**

## अवधान घरफोडीतील चड्डी बनियन गँग प्रमुखास मध्यप्रदेशात अटक




**धुळे, दि.२७ - अवधान एमआयडीसीतील कंपनीत घरफोडी करणाऱ्या चड्डी बनियान गँगच्या प्रमुखास मोहाडी पोलीसांनी मध्यप्रदेशातुन अटक केली. चोरी, घरफोडीची कबुली दिली असून त्याच्या अन्य साथीदारांविषयी माहिती पोलीस घेत आहेत.**

अवधान येथील एम. आय. डी. सी. मध्ये अनुराग मोरणकर, विवेक मोराणकर यांच्या मालकीच्या एल्मेक इंजिनीयर्स कंपनीचे गुदाम आहे. गुदामात प्रवेश करुन कॅबिनच्या ड्रॉवरमधून चोरट्यांनी एकुण १ लाख २५ हजारांची रोकड चोरुन नेली. ३ फेब्रुवारी पहाटे पूर्वी तीनच्या सुमारास घटना घडली. याप्रकरणी मोहाडी नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचा तपासात चड्डी बनियन गैंग चोरी करीत असल्याचे निष्पन्न झाले. सुमारे दोन वर्षापासुन चड्डी बनियन गैंगकडुन होत असलेल्या चोऱ्यांवर प्रतिबंध करण्याचे उद्देशाने मोहाडीनगर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांनी उपाय योजना केल्या. त्यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अशोक पायमोडे व अंमलदार यांचे पथक तयार केले. पथकाने एम.आय.डी.सी. अवधान परिसरात सतत पेट्रोलींग करुन, विविध **(पान ४ वर)**

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी निवेदन

नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी) - इंडियन पब्लिक सर्व्हिस एम्प्लॉईज फेडरेशनतर्फे केंद्रीय वेतन आयोगाच्या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे. फेडरेशनचे महासचिव प्रेमचंद यांनी केंद्रीय वेतन आयोगाचे अध्यक्ष यांना पत्र पाठवून कर्मचाऱ्यांच्या हिताच्या मागण्यांकडे लक्ष वेधले आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी दिली. निवेदनात म्हटले आहे की, कर्मचाऱ्यांच्या वेतनातील **(पान ४ वर)**

## अक्कलपाड्याचे पाणी उजव्या व डाव्या कालव्यात सोडा - मा.आ. कुणाल पाटील



**धुळे, दि.२७ - धुळे तालुक्यातील शेतीच्या सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी अक्कलपाडा प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यात आवर्तन सोडण्यात यावे अशी सूचना मा.आमदार कुणाल पाटील यांनी केली आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या व उजव्या कालव्यात पाणी सोडण्याबाबत कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प धुळे विभाग यांना मा. आमदार कुणाल पाटील यांनी सूचना केली आहे. याबाबत माहिती देताना मा. आमदार पाटील यांनी सांगितले की, यावर्षी उन्हाची तीव्रता वाढल्याने जमिनीतील पाण्याची पातळी खोल गेली आहे. परिणामी अनेक ठिकाणी विहिरींच्या पाण्याची पातळी खालावली आहे. काही ठिकाणी विहिरीने तळ गाठला आहे. शेतीच्या सिंचनासाठी असलेल्या पाण्याचे स्रोत आटले असून बागायती **(पान ४ वर)**

## शेतकऱ्यांसाठी डिझेलची व्यवस्था करा भारत आदिवासी पार्टीचे निवेदन



**नवापूर, दि.२७ (प्रतिनिधी) - सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व इतर कृषी यंत्रांसाठी डिझेल मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर भारत आदिवासी पार्टी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरविंद वळवी यांच्या नेतृत्वाखाली नवापूर तहसील कार्यालयात तहसीलदार दत्तात्रय जाधव यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.**

निवेदनात नमूद करण्यात आले की, सध्या देशासह राज्यात इंधन तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाली असून ग्रामीण भागातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा अपुरा होत आहे. त्यामुळे शेतीची मशागत, पेरणी, फवारणी तसेच इतर कृषी कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रॅक्टर व **(पान ४ वर)**

## फेसच्या आचार्य धर्मराज आश्रमातून चोरट्यांनी आठ लाखांचे ऐवज लांबवले

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी) - शहादा तालुक्यातील फेस गाव परिसरातील आचार्य श्री धर्मराज आश्रमात चोरट्यांनी मध्यरात्री धाडसी घरफोडी करीत तब्बल ८ लाख ६ हजार ४००रुपयांचा मुद्देमाल लांबविला. या धाडसी चोरीमुळे सारंगखेडा परिसरात खळबळ उडाली आहे.**

याबाबत आश्रम व्यवस्थापनाशी संबंधित अनिल गुरुदत्तदादा महानुभाव यांनी सारंगखेडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि.२५ मे रोजी मध्यरात्री १२ते २६ मे रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी आश्रमाच्या मुख्य प्रवेशद्वाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर थेट महिलांच्या निवास विभागाला लक्ष्य करत कपाटे, पेट्या, बॅगा व लॉकर्स फोडून मोठा ऐवज चोरून नेला. चोरट्यांनी रोख ३ लाख ४८ हजार रुपये, सोन्याच्या अंगठ्या, चेन, मंगळसूत्र, बाळ्या, टिकल्या, चांदीचे पूजेचे साहित्य, समई, ताटे, वाट्या तसेच इतर मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. चोरीस गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ८ लाख ६ हजार ४०० रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. चोरट्यांनी महिलांच्या खोल्यांतील बंद कपाटे फोडून सामान अक्षरशः अस्ताव्यस्त फेकून दिले होते. सकाळी आश्रमातील महिलांना हा प्रकार लक्षात येताच एकच खळबळ उडाली. आश्रम परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. **(पान ४ वर)**

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,41,100 रु.+3% GST
सोने- 24 K -1,54,000 रु.+3% GST
चांदी- 2,64,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## शितल सोसायटी परिसरात बैठक चोऱ्या संदर्भात पो.निरीक्षकांच्या सुचना



**नवापूर, दि.२७ (प्रतिनिधी) - शहरातील शितल सोसायटी परिसरात नुकत्याच घडलेल्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाच्या वतीने नागरिकांची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील तसेच वार्ड क्रमांक ७ चे नगरसेवक धर्मेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक संपन्न झाली.**

यावेळी परिसरातील नागरिकांनी वाढत्या चोरीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत पोलिस प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली. बैठकीत पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी नागरिकांना सुरक्षा संदर्भात महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

सोसायटी परिसरात वॉचमनची नियुक्ती करावी, प्रत्येक भागाचा स्वतंत्र व्हॉट्सॲप ग्रुप तयार करावा, बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना माहिती द्यावी तसेच परिसरात अधिकाधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच परिसरात घडलेल्या चोरीच्या घटनेचा तपास जलद गतीने सुरू असून, संबंधित चोरट्यांना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी नागरिकांना दिला. या बैठकीस शितल सोसायटी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोताणेला रोकडसह घरसामान लंपास

धुळे, दि. २७ - गोताणे (ता. धुळे) येथील महिलेच्या घरातुन ५५ हजारांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. केवळबाई सुकदेव पाटील यांचे घर असून सोमवारी त्या एका कार्यक्रमानिमित्त बाहेरगावी नातेवाईकांकडे गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी दुपारी त्या घरी परतल्या असता घराचे कुलूप तुटलेले दिसले. घरातील सामान अस्ताव्यस्त केलेले होते. तालुका पोलिसांना माहिती दिल्यानंतर त्यांनी पाहणी केली. चोरट्यांनी घरातील कपाट फोडले, ड्रॉवर मधील ५० हजारांची रोकड, ५ हजार रुपयांचे भांडे लंपास केले. केवळबाई पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसात गुन्हा दाखल झाला.

## जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्यांना ग्रामपंचायत करात माफी देणार - सरपंच



शहादा, दि.२७(प्रतिनिधी)- तालुक्यातील आडगाव ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेत ग्रामस्थांच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. या ग्रामसभेत सर्वप्रथम आडगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये जे विद्यार्थी शिकत असतील त्यांच्या पालकांनी ग्रामपंचायतचा अर्थात घरपट्टी, पाणीपट्टी व इतर तत्सम देय कर भरू नये. एक वर्षाचा पुर्ण कर माफ करण्यात आला आहे. या महत्वपूर्ण निर्णयाला ग्राम पंचायतीने मंजूरी दिली असून त्या आशयाचा ठराव करण्यात आला. या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळेची **(पान ४ वर)**


## व्यापाऱ्यांच्या हुकूमशाही कृ.उ.बा कडे शेतकऱ्यांची पाठ- किसान संघाचे पत्रक

**शिरपूर दि.२७ (का.प्र.)- शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये निवडक व्यापारी हुकूमशाही करीत असून त्यांच्यावर नियंत्रण राखण्यात समितीचे प्रशासन सपशेल अयशस्वी ठरले आहे. या मनमानी कारभाराला कंटाळून शेतकरी शिरपूरऐवजी शेजारी तालुक्यातील बाजार समितींमध्ये जाऊन शेतमाल विकत आहेत. त्याचा फटका शिरपूर बाजार समितीला बसत असून व्यापाऱ्यांवर नियंत्रण आणावे अशा मागणीचे निवेदन भारतीय किसान संघातर्फे दि.२५ मे २०२६ रोजी सहायक निबंधकांना देण्यात आले.**

निवेदनात म्हटल्यानुसार, शेतमाल खरेदी केल्यावर व्यापारी लगेचच देयक अदा करीत नाहीत. महिनाभरानंतरच्या रकमेचे चेक देतात. ते चेक वटत नाहीत. त्याबाबत तक्रार केल्यावर व्यापारी पैसे देतात. महिनाभर शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे विनाव्याजाचे वापरुन ते शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करीत आहेत. बाजार समितीमध्ये सुमारे ४० ते ४५ व्यापाऱ्यांकडे परवाना आहे. **(पान ४ वर)**


**सेंद्रिय जांभुळ**
संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

**१४ वा स्मृतीदिन**



**स्व. नलीनीताई सुधाकर मदाने**
(स्वर्गवास दि. २८/०५/२०१२)

**तुमचं असणं आयुष्यासाठी सर्व काही होतं,**
**ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होत,**
**आज तुमच्या पुण्याईने सर्व काही**
**असण्याची जाणीव आहे.**
**पण तुमचे नसणे ही मोठी उणीव आहे.**
**''परमेश्वर तुमच्या आत्म्यास चिरशांती देवो,**
**हीच ईश्वरचरणी प्रार्थना''**

दैनिक आपला महाराष्ट्र परिवार

# आपला महाराष्ट्र

## जागतिक लोकप्रियतेला गवसणी घालणारे नेहरू

देशाचे पहिले पंतप्रधान आणि द्रष्टे नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांचा काल ६२० स्मृतिदिन होता. २७ मे १९६४ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला. गांधीजींनी त्यांचे राजकीय वारसदार म्हणून नेहरूंची निवड केली. नेहरूंनी ती सार्थ केली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे पहिले पंतप्रधान ते झाले. उणीपुरी बारा वर्षे त्यांना मिळाली.त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची जीवनशैली विलक्षण होती.केवळ पहिले पंतप्रधान म्हणून नव्हे तर त्यांच्या समग्र जीवनाचा विचार करावा लागेल.त्यांचे वडील गर्भश्रीमंत वकील होते. अलाहाबादमध्ये आज जे स्वराज्य भवन आहे ते विस्तिर्ण जागेवर वसलेले सुंदर निवासस्थान होते.आश्चर्य म्हणजे ते त्यांनी देशासाठी दान केले. त्या काळातील सुमारे १४० कोटी रूपये किंमतीची इस्टेट त्यांनी देशाला समर्पित केली.त्यांच्या या त्यागाची तुलना इतर कुणाच्याही त्यागाशी होणार नाही एवढी त्याची व्याप्ती आहे. महात्मा गांधीजींच्या सहवासात आल्यावर हे कुटुंब पूर्णपणे बदलले. तत्पूर्वी त्यांचा सक्रिय संबंध कॉंग्रेसशी आला.कॉंग्रेस स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करीत होती.नेहरू परिवार स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरला.मोतीलाल नेहरू,माता स्वरूप राणी, जवाहरलाल,पतकी कमलादेवी, बहीण विजया लक्ष्मी पंडित, हे सर्व ब्रिटिशांच्या तुरूंगात होतै. ही बाब विलक्षण म्हणावी लागेल. नेहरू स्वत: ९ वर्षे तुरूंगात होते. भरजरी कपड्यात वावरणारे नेहरू चरख्यावर वर कातलेली जाडी भरडी खादी वापरू लागले. नगरच्या तुरूंगात त्यांनी भारत एक खोज हा अभ्यासपूर्ण ऐतिहासिक ग्रंथ लिहिला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील पिढ्यांना भारत कळला. आज त्यांच्यावर सडकून टीका होते.त्यांनी या देशासाठी काय केले असा प्रश्न सहज विचारला जातो. असा प्रश्न विचारणारांना नेहरू कधीच कळले नाहीत असेच म्हणावे लागेल.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक कफल्लक देश फाळणीच्या जखमा अंगावर घेऊन नेहरुंच्या हातात आला. संरक्षण असो, शिक्षण असो, दळणवळण असो, की अन्नधान्याचा प्रश्न असो, आरोग्याच्या समस्या आहोत सर्वच क्षेत्रात एक मोठी पोकळी होती. पण नेहरू नकारात्मक भूमिका घेऊन बसले नाहीत. त्यांनी झपाट्याने देश उभारणीच्या कामात हात घातला. आजही त्यांनीच उभ्या केलेल्या आय आय टी संस्था आपल्या उपयोगात येत आहेत. देशातच अभियंते तयार करण्याचे काम या संस्थांनी केले. पोलाद, विद्युत निर्मिती, अणुपरमाणू कार्यक्रम, संरक्षण सामुग्री चे उत्पादन, एच ए एल सारखी विमान निर्मिती कंपनी,भारत हेवी इलेक्ट्रॉनिक, हाफकीन, भामा अनुशक्ती केंद्र, अवकाश संशोधन, इस्रो सारख्या संस्था, अन्न धान्यात स्वयंपूर्ण होऊ असे उपाय त्यांनी योजिले, रस्ते, रेल्वे, विमान वाहतूक, औषध क्षेत्रात भरारी, प्रक्रिया उद्योग, नवरत्न कंपन्या काय काय सांगावे. अवघ्या बारा वर्षात नेहरूंनी बलदंड नेत्यांच्या सहकार्याने गरूड भरारी घेतली. शिक्षण क्षेत्र बळकट केले. पंचवार्षिक योजना ही त्यांची मोठी देणगी म्हणावी लागेल. संमिश्र अर्थ व्यवस्था आणि सक्षम गुठ निरपेक्ष परराष्ट्र धोरण ही त्यांच्या कारकिर्दीची प्रमुख वैशिष्ट्ये होती. स्वातंत्र्या नंतर देशाने बाळसे धरलेले असताना चीनने युद्ध पुकारले परंतु नेहरूंनी ते मुत्सद्देगिरीचा वापर करून थांबविले.अशा अनेक मुद्यांवर बोलता येईल. त्यांनी काहीच केले नाही असे म्हणणे कृतघ्नपणा चे म्हणावे लागेल. विशेषत: नव्या पिढीने नेहरू समजून घेतले पाहिजेत.

जुन्या पिढीतील असंख्य लोक असे आहेत की,त्यांनी त्याकाळात क्लास वनच्या नोकऱ्या केल्या. निवृत्तीनंतर गडगंज संपत्ती तयार झाली, आलिशान घरे झाली ते आणि त्यांची मुले नेहरूंनीच उभारलेल्या आय आय टीत शिकून प्रस्थापित झाले असे असताना नेहरूंनी आमचे नुकसान केले, देशाचे नुकसान केले असे म्हणण्यास ही मंडळी कचरत नाहीत. हा तर कृतघ्नपणाचा कळस झाला. यावरून त्यांची विचारसरणी लक्षात यावी. धर्म धोक्यात आहे असे म्हणणाऱ्या अर्धवट पिढ्यांना नेहरूंची संवैधानिक चौकट आणि धर्मनिरपेक्षतेची संकल्पना कधीच कळणार नाही. जेव्हा अटल बिहारी वाजपेयी जनता सरकारमध्ये परराष्ट्र मंत्री झाले तेव्हा परराष्ट्र मंत्रालयात जाऊन त्यांनी पदांची सूत्रे हाती घेतली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, नेहरूंच्या तसबिरी अधिका-यांनी काढून टाकल्या होत्या. त्यावेळी त्यांनी त्या पुन्हा लावायला सांगितल्या होत्या. आणि स्पष्ट केले होते की, नेहरूंचेच परराष्ट्र धोरण पुढे चालवावे लागणार आहे. नेहरूंचे मोठेपण यावरून लक्षात येईल. म्हणूनच ६४ वर्षांनंतर देखील त्यांच्या ध्येय धोरण आणि वैचारिक ठेवण याबद्दलची प्रासंगिकता कायम आहे. कायम राहील. कारण लोकांच्या मनात नेहरू आहेत. त्यांचे विचार, राष्ट्रदृष्टी आणि आधुनिक भारताची पायाभरणी आजही जिवंत आहे.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत अत्यंत बिकट अवस्थेत होता. फाळणीच्या जखमा, दारिद्र्य, अशिक्षण, अन्नटंचाई, दुर्बल उद्योगव्यवस्था, अपुरी आरोग्यसेवा आणि मर्यादित संरक्षण क्षमता अशा अनेक संकटांनी देश वेढलेला होता. अशा वेळी नेहरूंनी आधुनिक राष्ट्रनिर्मितीचा मार्ग स्वीकारला. विज्ञान, उद्योग, शिक्षण, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या पाच आधारस्तंभांवर त्यांनी नवाभारत उभा करण्याचा प्रयत्न केला.

नेहरूंचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते तर त्यांची दृष्टी व्यापक होती. स्वावलंबी भारताचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि त्यासाठी संस्थात्मक उभारणी केली.

त्यांचे परराष्ट्र धोरणही दूरदृष्टीचे होते. गुटनिरपेक्षतेची भूमिका स्वीकारून भारताला स्वतंत्र जागतिक ओळख मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

नेहरूंवर टीका होऊ शकते; कोणताही नेता त्रुटींपलीकडे नसतो. परंतु नेहरूंनी देशासाठी काय केले? हा प्रश्न विचारताना इतिहासाचा संदर्भ, त्या काळातील परिस्थिती आणि त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांची व्याप्ती लक्षात घेतली पाहिजे. आज अनेक पिढ्या ज्या शिक्षणसंस्था, उद्योगव्यवस्था आणि लोकशाही चौकटीचा लाभ घेत आहेत, त्यात नेहरूंचा मोठा वाटा आहे.धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधाननिष्ठ लोकशाही आणि आधुनिक भारताची कल्पना या मूल्यांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. म्हणूनच, त्यांच्या निधनानंतर अनेक दशकांनंतरही नेहरू लोकांच्या स्मरणात आहेत. त्यांच्याशी असहमती असू शकते, पण त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करणे इतिहासाशी अन्याय ठरेल. आचार्य अत्रे नेहरूंचे टीकाकार होते.परंतु त्यांच्या कामगिरीवर खुश होते. नेहरूंच्या निधनानंतर त्यांनी बरेच अग्रलेख मराठा मधून लिहिले आणि ख–या अर्थाने त्यांना अभिवादन केले.अश्रू आणि फुले' या लेखामध्ये आचार्य अत्रे म्हणतात, जिवंतपणी सर्वत्र जयजयकार आणि मृत्यूनंतर चहुकडे हाहा:कार अशी विराट आणि विश्वव्यापी लोकप्रियता पंडित नेहरूंना जेवढी लाभली, तेवढी क्वचितच यापूर्वी जगातल्या कोणत्याही महापुरुषाला लाभली असेल. जागतिक लोकप्रियतेचे शतकानुशतकांचे उच्चांकच नेहरूंनी मोडून टाकले असे म्हणावयाला हवे. नेहरू हे केवळ राष्ट्रपुरुष नसून विश्व पुरुष होते ही गोष्ट त्यांच्या मृत्यूनंतर का होईना, पण आता सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट झालेली आहे. नेहरुंच्यावर शोकाश्रूंची जेवढी वृष्टी झाली, तेवढाच प्रेमाच्या आणि आदराच्या फुलांचाही अपरंपार वर्षाव झाला. किंबहुना, आमच्यापैकी कोणाचा वर्षाव अधिक होतो आहे याची अश्रू आणि फुले यांच्यामध्ये जणू काही चढाओढच लागून राहिली होती!अशा शब्दांमध्ये नेहरूंच्या अंतिम यात्रेचे वर्णन अत्रे यांनी केलेले आहे. क्रांतिकारी कवी नारायण सुर्वे यांनी त्यावेळी जी कविता लिहिली ती उद्धृत करण्याचा मोह आवरता येत नाही.एवढी ती चपखल आहे.प्रासंगिक आहे. नेहरू गेले त्या वेळची गोष्ट या कवितेत ते लिहितात –

पाठ शेकवीत बसलेली घरे कलकलली
शहर कसे करडे होत गेले
नंतर अंजिरी
पुढे... काळोखाने माणिक गिळले.
दगडी गाऊन घातलेले कारखाने
चिरुट शिलगावीत
विचारात बुडाले.
नंतर...
ओलेच खमीस खांद्यावर टाकून
खुराड्याकडे वळले.
'क्या हुआ ए सुंदरे....!'
---'आज लोबन मत जला.... नेहरू गये!!'
'सच; तो चलो आज छुट्टी ! ...'
शीण पेलणारे जग खाटेवर कलले.
मी उदास खिन्न होऊन चाललो
रस्ते कसे भयाण वाटले
कागदी खोळीत उजेड घेऊन चाललेला हातगाडीवाला.
मी विचारले,
'हा प्रकाश आता कशाला नेतो आहेस !'
'वा राव ;
पुढे काळोख दात विचकीत असेल!'असा

नेहरूंचा प्रभाव होता.त्यांच्या स्मृतिंना प्रणाम.



## वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक भयभीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पोलिस प्रशासनाला साकडे

**नवापूर, दि.२७ प्रतिनिधी- नवापूर शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून घरफोडी, दुचाकी चोरी, मोबाईल चोरी तसेच मंदिरांमधील चोरीच्या प्रकारांनी शहरवासीयांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या वतीने नवापूर पोलिस प्रशासनाला निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली.**

ज्येष्ठ नेते भरत गावीत, नगराध्यक्ष जयवंत जाधव व उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी नवापूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील यांची भेट घेत शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले की, रात्रीच्या वेळी घरफोडी व वाहन चोरीचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. दिवसाढवळ्याही दुचाकी चोरीच्या घटना घडत असून काही मंदिरांमध्येही चोरी झाल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख चौक, रस्ते व संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, रात्रीची पोलिस गस्त वाढविणे तसेच संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवून चोरीच्या घटनांवर आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना प्रत्येक वार्डात नागरिकांच्या सहकार्याने सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याचे आवाहन केले. प्रत्येक वार्डातील नागरिकांनी एकत्र येऊन वॉचमनची व्यवस्था उभारावी. पोलिस प्रशासन चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी कठोर पावले उचलत असून चोरट्यांचा बंदोबस्त लवकरच करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी बाहेरगावी जाताना शेजारी किंवा परिसरातील नागरिकांना माहिती द्यावी, जेणेकरून घरांवर लक्ष ठेवणे शक्य होईल व चोरीच्या घटना टाळता येतील, असेही त्यांनी सूचित केले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) शहराध्यक्ष मनोहर नगराळे, अमृत लोहार, पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, कारखाना संचालक हरीष गावीत, नगरसेवक शिरीष प्रजापत, अल्तमस खाटीक, मनोहर गावीत, नविद शहा, उमेश चव्हाण, महेंद्र दुसाने, राजू आगळे, जैनू गावीत, जयेश जयस्वाल आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दोन जैन साध्वींचा अपघाती मृत्यू कारवाईची मागणी- निवेदन सादर

**शहादा,दि.२७ (का.प्र.) - जैन समाजातील दोन परमपूज्य साध्वींचा पायी विहार सुरू असताना, त्यांच्या अंगावर हेतू पुरस्कर वाहन घालून त्यांना चिरडल्याची अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना घडली आहे. या अमानुष घटनेत दोन्ही साध्वींचा जागीच मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आणि आरोपीला कठोर शासनाची मागणी करण्यासाठी आज शहादा सकल जैन समाज आणि हिंदू बांधवांच्या वतीने उपविभागीय कार्यालयात तहसीलदार संभाजीराव पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले.**

परमपूज्य प्रातःस्मरणीय समाधी सम्राट दिगंबर आचार्य श्री विद्यासागर जी महाराज यांच्या सुयोग्य शिष्या तसेच आचार्य श्री समय सागर जी महाराज यांच्या आज्ञेनुवर्ती परमपूज्य १०५ क्षुतिमती माताजी व परमपूज्य १०५ उपशमती माताजी या पायी विहार करीत असताना रशीद अहमद अली नामक वाहन चालकाने हेतू पुरस्कर वाहन त्यांच्या अंगावर घातले. या भीषण अपघातात दोन्ही महासतीजींचे निधन झाले असून संपूर्ण जैन समाजामध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे.

या प्रसंगी शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष सौ.माधवी मकरंद पाटील, डॉ. कांतीलाल टाटिया, विनय गांधी, प्रदीप टाटिया, कचरुलाल नाहटा, विजय चोपडा, हेमराज लोढा, पारस कुचेरिया, अजित गेलडा, अनिल छाजेड, यांसह अखिल भारतीय जैन संघटना, मूर्तीपूजन युवक संघ व समता युवक संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बकरी ईदचा सण सर्वधर्म समभावाने साजरा करा- जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**धुळे, दि.२७- जिल्ह्यात बकरी ईद हा सण सर्वधर्म समभावाने साजरा करावा. कायदा आणि सुव्यवस्थेचे सर्वांनी पालन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या. बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज दुपारी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते बोलत होत्या.**

यावेळी पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडनीस, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, पशुसर्वधन उपायुक्त डॉ. गिरीश पाटील, महानगरपालिका उपायुक्त करुणा डहाळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. संवर्धन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्वतोपरी नियोजन केले आहे. सण साजरा करताना त्याचे पावित्र्य टिकून राहील याची दक्षता घ्यावी. महानगरपालिकेने आवश्यक त्या उपाययोजना करतानाच स्वच्छता, वीज, पाणी आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. बकरी ईद सणासाठी लागू असलेल्या नियमांचे सर्वांनी पालन करावे. महापालिका आयुक्त श्री. कापडणीस यांनी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेतर्फे सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. स्वच्छतेसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक श्री. आनंद यांनी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस दलाने केलेली तयारी, तैनात बंदोबस्त याविषयी सविस्तर माहिती देतानाच समाज माध्यमांचा वापर करताना तरुणांनी सतर्क राहावे. अफवांवर विश्वास ठेऊ नये, असेही आवाहन केले. पशुसर्वधन उपायुक्त डॉ. पाटील यांनी बकरी ईद सणानिमित्ताने जनावरांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच प्रशासनाच्या नियोजनानुसार कामे करण्यात येईल, असे सांगितले.

## जन शिक्षण संस्था धुळे रिसोर्स पर्सन क्षमता बांधणी कार्यक्रम संपन्न

धुळे, दि.२६ - कौशल्य विकास उद्योजकता मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान , धुळे येथे रिसोर्स पर्सन क्षमता बांधणी कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन इब्राहिम शेख सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ड .सौ.गायत्री भामरे मॅडम, संचालिका सौ. तय्यबा शेख मॅडम,सर्व प्रशिक्षक, रिसोर्स पर्सन व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये रिसोर्स पर्सन यांना प्रशिक्षण पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद कौशल्य, शिस्त, जबाबदाऱ्या, प्रशिक्षण व्यवस्थापन तसेच कौशल्य विकास याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विविध सत्रांद्वारे प्रभावी अध्यापन पद्धती व प्रशिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी रिसोर्स पर्सन यांनी प्रामाणिकपणे कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच संचालिका मॅडम यांनी सर्व रिसोर्स पर्सनला मार्गदर्शन केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.




## शहाद्यात संत भीमा भोई यांची जयंती उत्साहात साजरी; मान्यवरांची उपस्थिती

**शहादा,दि.२७(का.प्र.) - शहादा शहरात परम संत भीमा भोई यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहादा भोई पंच मंडळाच्या वतीने संत भीमा भोई चौक येथे अत्यंत आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात जयंती उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध सामाजिक उपक्रम आणि मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.**

जयंतीच्या पावन पर्वावर चौकातील संत भीमा भोई यांच्या पहिल्या फलकाचे पूजन शहादा भोई पंच मंडळाचे अध्यक्ष संजय साठे यांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून करण्यात आले. तर दुसऱ्या फलकाचे प्रतिमा पूजन मंडळाचे उपाध्यक्ष उमाकांतभाऊ शिवदे यांच्या हस्ते झाले. तसेच, अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष सुपडूभाऊ खेडकर यांच्या हस्ते तिसऱ्या फलकावर माल्यार्पण व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक जयवंतभाऊ मोरे यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी संत भीमा भोई यांच्या बालपणातील संघर्ष आणि त्यांच्या समाजोद्धारक कार्याविषयी सविस्तर मनोगत व्यक्त करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे, अखिल भारतीय भोई समाज वधू-वर परिचय कल्याणकारी मंचच्या वतीने तयार करण्यात आलेल्या वधू-वरांच्या माहितीच्या पीडीएफ पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या हस्ते अत्यंत थाटात संपन्न झाला. या उपक्रमाचे समाज बांधवांकडून कौतुक होत आहे.या मंगलमयी कार्यक्रमाला शहादा भोई पंचमंडळाचे सचिव गुलाबराव सोनवणे, सहसचिव आर.डी. मोरे सर, राष्ट्रीय सदस्य जयंतीलालभाऊ खेडकर, माजी अध्यक्ष अशोकभाऊ शिवदे, वधू-वर परिचय मंचाचे संचालक महेंद्र खेडकर सर, सुरेशभाऊ मोरे, शांतीलाल साठे, मोहन मोरे सर, माजी युवा अध्यक्ष योगेशभाऊ खेडकर उपस्थित होते.


तसेच निवृत्त पीएसआय रामलाल साठे, निवृत्त पीएसआय पंडित वाडीले, निवृत्त पीएसआय मधुकर साठे, संतोषभाऊ शिंगणे, मोहन साठे, काशिनाथ खेडकर, संजय तावडे सर, नथ्थू मोरे सर, तमखाने सर, आधार मोरे सर, चुडामन सूर्यवंशी, सी.डी.खेडकर सर, वसंतभाऊ नुक्ते, राजा खेडकर सर, स्वप्निल मोरे, राकेश खेडकर यांसह भोई समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय खेडकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गुलाबराव सोनवणे यांनी मानले.

## शहाद्यात श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन

शहादा,दि.२७ (का.प्र.) - येथील गांधीनगर भागात अधिक मासाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा सप्ताहाला उत्साहात सुरुवात झाली आहे. या सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असल्याने संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

सप्ताहात दररोज रात्री ८ ते ११ वाजेदरम्यान मध्य प्रदेशातील कंचनखेडी (रतलाम) येथील सुप्रसिद्ध भागवत कथाकार आचार्य अनिल शर्मा महाराज हे आपल्या रसाळ वाणीतून कथेचे निरुपण करत आहेत.

### प्रकाश में आज
## दयावान




फिरोज खान, मिथुन दिव्हीती, विनोद खन्ना, अमरीशपुरी,

### शब्दकोडे क्रमांक : २३७६



**आडवे शब्द :** १. वंदन ५.एकरूप होण्याची क्रिया ८.मालवणी बोलीत-मला ९.दक्ष ११.ग्रामीण बोलीत-वर्ष १३.ज्वर १४. दैना १५.प्रत्येक १६.मावशीच्या नात्यातला १८.युद्ध १९. माराचे निशाण २०.विस्मृती २१.उपदेश-हिंदीत २२.तुरुंगवास २४.आकाशात चमकणारी चांदणी वा ग्रह २५.किंमत २७.अंतर २९.छत ३१.तबल्याचा जोडीदार ३२.एखादयाची लागलेली ओढ ३५.एखाद्या पदार्थाचा तुकडा ३७.महाराष्ट्र भूमीची खरी ओळख ३८.परमेश्वर,नशीब ४०.शासन ४२.कैची ४४.समय ४५.लीन ४६.दुकान-हिंदीत ४८.हळूहळू ५०.राक्षस ५२.चर्चा ५५.भारतातील एक नदी ५६.शंखाचा ध्वनी **उभे शब्द :** १.अमावस्या २.भिक मागणारा ३.कीव ४.दर ६.विचार ७.चर्चेचा अवधी ९.सर्प १०.पाणी साठवण्यासाठी त्यावर बांधले जाते १२.कागदाच्या डाव्या बाजूस असलेला रकाना १३.साठ मिनिटांचा अवधी १५.एक मिठाईचा पदार्थ १७.आशीर्वाद १८.प्रजा १९.लग्नाची मिरवणूक २०.अति भव्य २२.काक २३.नेहमी २६.सतत रडणारा २८.तलफा-उलट लिहा ३०.नात्यात नसलेला ३३.अंतर,आकाश ३४.प्रभावी ३६.माराचे वण ३७.नागपूर येथील प्रसिद्ध फळ ३९.ठिकाण ४१.रत्न ४२.लोखंड घासण्याचे साधन ४३.नौका ४७.इच्छा ४८.सप्त ४९.अंधार ५१.उमर ५३.केसांवरील बट ५४.हिंदीत-आठवण

### शब्दकोडे क्रमांक : २३७५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | नं | त | | क | ळ | | ब | | म | ग | र |
| द | | ला | ग | ण | | भा | ना | म | ती | | स |
| मा | न | व | | ख | त | र | ना | क | | ना | ना |
| स | म | | वा | र | | त | | रं | ज | क | |
| | न | ग | र | | घी | | सा | द | र | | मा |
| मो | | ल | सा | वि | | हौ | द | | ब | द | क |
| ह | ल | का | | त | पा | स | | स | | ग | ड |
| न | ग | | च | र | क | | ब | ड | ब | ड | |
| | ट | क | म | क | | को | | क | ल | | म |
| क | | वा | चा | | श | र | द | | क | या | स |
| स | व | य | | सा | र | स | बा | ग | | द | ल |
| ब | र | त | न | | म | | व | र | ण | | त |






पान १ वरुन

## निवडणूक आयोगाची एस.आय.आर मोहिम वैध
### याचिकाकर्ते आणि ज्येष्ठ वकील अश्विनी उपाध्याय यांची प्रतिक्रिया

आज सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर संदर्भात अत्यंत स्पष्ट निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर ची संपूर्ण प्रक्रिया वैध ठरवली आहे. अशा प्रकारची मोहीम राबवणे हा निवडणूक आयोगाच्या कायदेशीर कार्यकक्षेतला भाग आहे, यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.

**काय होते मूळ प्रकरण आणि वाद?**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात ही विशेष एसआयआर मोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान पश्चिम बंगालमधील मतदार यादीतून तब्बल नव्वद लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती.

या कारवाईनंतर देशाच्या राजकीय वर्तुळात प्रचंड गदारोळ झाला होता. मतदार यादीतून ज्यांची नावे वगळली गेली, त्यामध्ये बहुतांश मुस्लिम मतदार असल्याचा दावा करत विरोधकांनी निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले होते. निवडणूक आयोगाने जाणीवपूर्वक ही नावे वगळली असून, यामुळे पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर थेट प्रभाव पडल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. जरी नंतरच्या काळात यापैकी काही मतदारांची नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली असली, तरी हे प्रमाण अत्यंत नगण्य होते. या संपूर्ण प्रक्रियेच्या वैधतेला विरोधक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

**निकालाचे राजकीय महत्त्व**

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाला खूप मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या स्वायत्ततेला आणि अधिकारांना सर्वोच्च न्यायालयाचे कायदेशीर कवच मिळाले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बोगस मतदार हटवणे आणि मतदार याद्यांचे शुद्धीकरण करणे या निवडणूक आयोगाच्या मोहिमेला आता अधिक गती मिळण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे, हा निर्णय विरोधकांसाठी एक मोठा कायदेशीर झटका मानला जात आहे.

## धुळे जिल्ह्यात मतदार याद्यांचे होणार पुनरीक्षण

तसेच उपलब्ध असल्यास २००२- ०४ मधील विशेष पुनरीक्षणातील जुनी नोंद समाविष्ट असेल. मतदारांना आवश्यक असल्यास स्वत:ची माहिती अद्ययावत करण्याची तसेच नवीन छायाचित्र उपलबध करून देण्याची सुविधा असणार आहे.

मतदारांना स्वत:ची अथवा कुटुंबातील सदस्यांची माहिती पडताळून पाहण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर सुविधा उपलब्ध आहे. तसेच आवश्यक माहिती व मार्गदर्शनासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधता येणार आहे. घर भेटीदरम्यान संबंधित कुटुंबीय घरी उपलब्ध नसल्यास मतदार केंद्रस्तरीय अधिकारी किमान ३ वेळा भेट देणार आहेत. तरीही संपर्क होऊ न शकल्यास गणना प्रपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार असून, त्याबाबतची सूचना संबंधित मतदारांना देण्यात येणार आहे.

## ब्रह्मपुरीत राज्यातील उच्चांकी तापमान

करण्यात आला आहे. येथील नागरिकांना दुपारच्या वेळी अत्यंत सावध राहण्याचा आणि गरज नसल्यास बाहेर न पडण्याचा इशारा दिला आहे. अकोला, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. येथेही तापमानाचा पारा सरासरीपेक्षा खूप जास्त राहण्याची शक्यता आहे. नागपूर आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या मोबाईलवर मुंबई मंत्रालयाकडून सलग दुसऱ्या दिवशी हाय अलर्टचा संदेश पाठवण्यात आला. अचानक मोबाईलवर अत्यंत मोठ्या आवाजात बिझिंग टोन धोक्याची घंटा वाजून स्क्रीनवर उष्णतेच्या लाटेचा मेसेज झळकल्याने अनेक नागरिक काही क्षणांसाठी पुरते घाबरले. हा आपत्कालीन संदेश केंद्र आणि राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना पूर्वकल्पना देण्यासाठी पाठवला जात आहे. या मेसेजमध्ये पुढील २४ तास विदर्भासाठी अत्यंत महत्त्वाचे असून तीव्र उष्णतेच्या लाटेपासून स्वतःचे रक्षण करा असे आवाहन करण्यात आले आहे.

## एसी सरकारला मानणाऱ्यांनी शिंदखेडा तालुक्यात एस.आय.आर.च्या घरगणना कामाला लावली मोगरी

केला असल्यामुळे सतारे या गावाच्या एस आय आर च्या कामात अडथळा निर्माण झालाय झाला आहे. एस आय आर च्या कामासाठी प्रथम सर्कल, प्रगणक, परिवेक्षक, तलाठी गेले असता त्यांना विरोधाचा सामना करावा लागला.नियमाप्रमाणे घरगणना करताना उत्तरेकडून मोजणीला सुरुवात करावी लागते.प्रत्येक घरमालकांकडे किंवा भाडेकरी म्हणून राहत असले त्यांच्या ताब्यात असलेल्या घराची माहिती नोंदवून घेतली जाते.उत्तरेकडून दक्षिणेकडे ही मोजणी सुरू होताच एसी सरकारला मानणाऱ्या एखाद्या व्यक्तीचे घर मध्ये आले की त्याच्या विरोधाला सामना करावा लागतो. गावात त्यांचे जे प्रमुख आहे ते पुढे येतात व सन सोळाशे एसी सरकार ला आम्ही मानणाऱ्या आहोत, असे म्हणत घरगणना करू नका असे सांगतात. यामुळे कामकाज थांबते. कारण नियमानुसार एकीकडून सुरुवात केल्यावर प्रत्येक घर मोजले गेलेच पाहिजे.तुम्हाला मध्ये घर सोडता येत नाही. हा नियम अडवा येत असल्याने विरोध झाल्यास कामकाज थांबते. दुसऱ्या खेपेस तहसीलदार पोलिसांसह फौज फाटा गेला असता संघटितपणे विरोध केला जातो व माहिती देखील दिली जात नाही. शासकीय कर्मचाऱ्यांनी विनंत्या करून एसी सरकारच्या सदस्यांना तयार केले असता ते म्हणतात ठीक आहे,आम्ही सांगतो त्याप्रमाणे नावे नोंदवा.ही नावे नोंदवायची ठरवली तर प देखील स्वीकारणार नाही अशी यादी सांगितली जाते . या मध्ये रावल्या सोमा,आई काशीबाई सोमा, वडील निंबा सोमा (ही काल्पनिक नावे आहेत) अशाप्रकारे नावे सांगितले जातात. एवढी नावे पमध्ये बसत नसल्याने एस आय आर च्या कामासाठी नेमण्यात आलेल्याची पंचायत होते.या पहिल्या टप्प्यातीलच कामाला हे अडथळे येत असल्याने सतारे गावातील एस आय आर चे काम तब्बल दहा दिवसा पासून थांबले आहे. अठराशे लोकसंख्या असणाऱ्या या गावाची गणना दोन चार दिवसात होणे क्रमाप्राप्त होते. पण एसी सरकारच्या मोगरीमुळे थांबलेले आहे. एकीकडे भारत सरकारला न मांडणाऱ्या सदस्यांनी सरकारचे फायदे मात्र वेळोवेळी घेतले आहे.एकशे पंधरा एकर जमीन शासनाने त्यांना दिली आहे. चलनात भारतीय रुपयात वापरतात. नव्या पिढीतील ३०-३५ मुले दहावीपर्यंत शिकलेली आहे. त्यांचे पुढारी मात्र काळा कोट व धोतर घालून शासकीय कर्मचाऱ्यांना सामोर येतात व वारंवार आम्ही सन सोळाशे एसी सरकारचे समर्थक आहोत,असे सांगतात. आम्ही तुमच्या सरकारला मानत नाही असे म्हणतात. गावातील निवडणुकीमध्ये ते सहभाग घेत नाही.त्या प्रभागामधील जागा या शेड्युल ट्राईब साठी राखीव आहेत. त्यांनी कास्ट सर्टिफिकेट देखील घेतलेले नसल्याचे सांगण्यात येते.यामुळे कोणी ग्रामपंचायतीचा फॉर्म भरला तर तो नामंजूर होतो.मतदानाला सुद्धा त्यांचा विरोध असतो पण बड्या पुढाऱ्यांनी जर हस्तक्षेप केला आणि समजून सांगितलं तर ते मतदान करतात असे दिसून आले.त्यांच्या तीन वार्डातील जागा या नेहमी रिकाम्या असतात शेड्युल ट्राईब मध्ये आम्हाला धरू नका.आम्ही एसी सरकार वाले आहोत, हे त्यांचे म्हणणे असते. २०२५ मध्ये देखील त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून एसी सरकारचे म्हणणे मांडले होते.आता एसआयआर च्या कामाला पहिल्या टप्प्यातच ब्रेक लागला असल्याने जिल्हाधिकारी यावर काय भूमिका घेतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## बकरी ईदसाठी मुस्लीम बांधवांची जय्यत तयारी

मनपा प्रशासनही प्रयत्नशील आहे. इदगाह मैदानावर बकरी ईद निमित्त नमाज पठणासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने एस.टी.बसचा मार्ग नमाज कालावधीत वळविण्यात आला आहे.

पान १ वरुन

## बड्या कंपन्याकडे खंडणीची मागणी काम ठप्प

इथेच थांबला नाही. या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी दुपारी,तेच तिघे जण त्यांच्यासोबत आणखी ४ ते ५ साथीदारांना घेऊन पुन्हा कंपनीत आले. त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या प्रकल्प अधिकारी व कामगारांवर अमानुष हल्ला चढवला आणि त्यांना बेदम मारहाण केली.कंपनीचे साहित्य उद्ध्वस्त करण्याची धमकी देतकोणालाही जिवंत सोडणार नाही,असा इशारा त्यांनी दिला.या अचानक झालेल्या प्राणघातक हल्ल्यामुळे कर्मचारी आणि अभियंत्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले.

**भीतीच्या छायेत कर्मचारी**
**दोन महिन्यांपासून काम ठप्प**

या हल्ल्याचा आणि धमक्यांचा परिणाम इतका गंभीर झाला आहे की,कंपनीत काम करणारे अनेक कर्मचारी आपले प्राण वाचवण्यासाठी काम बंद करून थेट आपापल्या गावी निघून गेले आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पूर्णपणे ठप्प असून, यामुळे कंपनीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. निर्माण झालेल्या प्रचंड भीतीमुळे एकही कर्मचारी किंवा अभियंता पुन्हा कामावर परतण्यास तयार नसल्याचे समजते.

**नोएडा येथील जनरल मॅनेजरकडून**
**तक्रार; पोलिसांत गुन्हा दाखल**

कंपनी प्रशासनाने अखेर या गंभीर प्रकरणाची दखल घेतली. कंपनीचे नोएडा येथील जनरल मॅनेजर विवेक हरिकिशन सच्चर यांनी स्वत:पुढाकार घेत पिंपळनेर पोलिस ठाणे गाठले आणि फिर्याद दिली.त्यांच्या तक्रारीवरून पिंपळनेर पोलिसांनी ७ ते ८ अज्ञात खंडणीखोरांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

**औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

साक्री तालुक्यात दिवसाढवळ्या घडलेल्या या गुंडगिरीमुळे ग्रामीण भागातील औद्योगिक प्रकल्पांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे.जर शासकीय मान्यताप्राप्त आणि मोठ्या प्रकल्पांवर असे हल्ले होणार असतील,तर उद्योजकांनी गुंतवणूक कशी करावी,असा प्रश्न उपस्थित होत आहे. खंडणीखोरांच्या या वाढत्या दबदब्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि व्यापारी वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात असून,या गुंडांना तातडीने अटक करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## फेसच्या आश्रमातून चोरट्यांनी आठ लाखांचे ऐवज लांबवले

घटनेची माहिती मिळताच सारंगखेडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच चोरीचा माग काढण्यासाठी श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. श्वान पथकाने दोंडावाडे गावालगत रस्त्याच्या परिसरात संशयित हालचालींचा माग घेतल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी भेट देत संपूर्ण घटनेची पाहणी केली. त्यांनी तपास अधिकाऱ्यांना आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या असून परिसरातील संशयित हालचाली, सीसीटीव्ही फुटेज तसेच गुन्हेगारी रेकॉर्डची पडताळणी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. फेस गाव परिसरात अवघ्या एका महिन्याच्या कालावधीत घडलेली ही दुसरी मोठी चोरी असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, फेस गावापासून काही अंतरावर असलेल्या तोरखेडा येथे दि.४ मे रोजी प्रल्हाद गिरनार यांच्या राहत्या घरातही जबरी चोरी झाली होती. मात्र, त्या घटनेतील आरोपींचा शोध घेण्यात सारंगखेडा पोलिसांना अद्यापही यश आलेले नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढले आहे. एक चोरी उघडकीस येत नाही, तोपर्यंत दुसरी घटना घडते, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. ग्रामीण भागात सातत्याने वाढणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्येअसुरक्षिततेची भावना अधिक तीव्र झाली असून रात्रीच्या गस्तीसह पोलिसांनी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी लागली.

## अवधान घरफोडीतील चड्डी बनियन गॅंग प्रमुखास अटक

सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. चोरट्यांचे वर्णन, राहणीमान, त्यांच्या गुन्हे करण्याच्या कार्यपध्दतीबाबतचा अभ्यास केला. त्यानुसार चोरी, घरफोडी करणारे चड्डी बनियन गॅंगमधील चोरटे मध्य प्रदेशातील असून ते सक्रीय असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. पथकाने मध्य प्रदेश राज्यात सतत आठ दिवस थांबुन त्यांचे लोकेशन व वास्तव्याबाबत माहिती काढली असता, मध्यप्रदेश येथील परेठा (ता. कुक्षी, जि.धार) येथून चड्डी बनियन गॅंगचा प्रमुख कुंदनसिंग ऊर्फ कुंद्या भिकीया डावर (वय-३५ ) याचा शोध घेवून ताब्यात घेतले. त्यास सखोल विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदारांसह एम.आय. डी.सी. अवधान येथे चोरी व घरफोडी केल्याची कबुली दिली. उर्वरीत आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. चड्डी बनीयन गॅंगच्या प्रमुखास अटक करुन, मोहाडी पोलिसांनी हा घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उप अधीक्षक राजकुमार उपासे यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक शिल्पा पाटील, उपनिरीक्षक पायमोडे, करंडे आणि हवालदार निलेश पाटील, ललिता मराठे, दरबारसिंग गिरासे, मनिष सोनगीरे, मयुर थोरात, मुकेश मोरे, भगवान ढाकणे यांनी कारवाई केली.

## शेतकऱ्यांसाठी डिझेलची व्यवस्था करा

यंत्रसामग्रीची कामे ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरीप हंगाम हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा काळ असल्याने डिझेलअभावी शेतीकामांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना डिझेलसाठी अनेक किलोमीटर प्रवास करावा लागत असून काही ठिकाणी दीर्घ रांगा लागत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढत आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल वितरण केंद्र किंवा विशेष कोटा उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी आमदार शिरीषकुमार नाईक यांनी शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनासमोर मांडत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. शेतकरी हा देशाचा कणा असून खरीप हंगामात त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये. शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून त्वरित कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले. तहसीलदार दत्तात्रय जाधव यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागणी शासन स्तरावर पाठविण्यात येईल व आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या प्रसंगी भारत आदिवासी पार्टीचे पदाधिकारी,माजी जि प सदस्य सोमु गावीत,देवलीपाडा माजी सरपंच मोहन वसावे, सिंगा वळवी,विनोद वळवी,करणसिंग गावीत सह कार्यकर्ते, शेतकरी बांधव तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## अक्कलपाड्याचे पाणी उजव्या व डाव्या कालव्यात सोडा

शेती करताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. पाण्याअभावी उन्हाळी तसेच भाजीपाला व फळ पिके करपली आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या विहिरींची पातळी खालावल्याने अनेक ठिकाणी पाण्याचा तुटवडा निर्माण होत आहे. परिणामी शेत शिवारात गुरेढोरे,शेळ्या,मेंढ्या, पाळीव प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. खरीप हंगाम तोंडावर आला असून शेतकरी आता हवामानाच्या अंदाजानुसार कापूस पिकाची लागवड करणार आहेत. म्हणून कापूस लागवडीसाठी पाण्याची आवश्यकता भासते. धुळे तालुक्यात सर्वात जास्त कापसाची लागवड केली जात असते त्यासाठी अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या व उजव्या कालव्याला आवर्तन सोडणे आवश्यक आहे. सदर पाणी सोडल्यानंतर पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या सिंचनासाठी मदत होणार आहे. दरम्यान अक्कलपाडा प्रकल्पातील रब्बी हंगामासाठी एकच आवर्तन सोडण्यात आले होते. म्हणून दुसरे आवर्तन तातडीने सोडावी अशी ही मागणी मा. आमदार कुणाल पाटील यांनी केली आहे.

पान १ वरुन

## वाय वन कापसाचा काळाबाजार थांबवा

८५२ रुपये असतांनाही शिरपूर तालुक्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या साठ्यातील बहुतांश पाकिटे अडीच ते तीन हजार रुपये दराने विकली गेली. त्याबाबत तक्रारी झाल्यानंतर भरारी पथकाने चौकशी केली. त्याचा चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, संबंधित विक्रेत्यांची कसून चौकशी करुन कठोर कारवाई करावी अन्यथा आंदोलन केले जाईल असे निवेदनातून म्हटले आहे. निवेदन देतांना नयन माळी, चेतन मोरे, यश राजपूत, कुणाल भदाणे आदि उपस्थित होते.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी निवेदन

विसंगती दूर करणे, महागाई भत्ता व इतर भत्त्यांमध्ये सुधारणा करणे, तसेच निवृत्ती वेतनधारकांच्या समस्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना सन्मान जनक जीवनमान मिळावे व त्यांच्या आर्थिक अडचणी कमी व्हाव्यात यासाठी वेतन आयोगाने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. फेडरेशनने केंद्र सरकारच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची विनंती करत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

## ग्रामपंचायत करात माफी देणार - सरपंच

पटसंख्या वाढण्यास मदत होणार आहे. तसेच विविध विकास कामे राबविण्याबद्दल चर्चा करण्यात आली. यास ग्रामस्थांनी एक मुखाने मंजुरी दिली. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच जितेश रावताळे होते. यावेळी उपसरपंच गौरीबाई संजय खर्डे, सदस्या गीताबाई किरण खर्डे, पूनम बाबुलाल भील, वंदना किशोर भील, सुदाम खर्डे, कृष्णा खर्डे, कृष्णा पावरा, पोलीस पाटील गौतम खर्डे, मुळासिंग ठाकरे, माजी सरपंच संजय खर्डे, भीमसेन मुसळदे, रमेश मुसळदे, सुनील वाघ, ग्रामविकास अधिकारी वामन पाडवी, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित पावरा व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यापाऱ्यांच्या हुकूमशाही कृ.उ.बा कडे शेतकऱ्यांची पाठ

प्रत्यक्षात त्यांच्यापैकी फक्त चार ते पाच जण अत्यंत कमी दराची बोली लावतात. अशा व्यापाऱ्यांचा परवाना रद्द करणे आवश्यक आहे. बाजार समितीच्या वजन काट्यापेक्षा व्यापाऱ्यांच्या काट्यावर वजन कमी भरते. यामधील गौडबंगाल उघड होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची शेड शेतकऱ्यांनाच उपलब्ध करुन द्यावी, त्यांना पिण्याचे शुद्ध पाणी व अल्पदरात भोजन सुविधा द्यावी, खेडा पद्धतीने खरेदी करणाऱ्या परवानाधारक व्यापाऱ्यांना बाजार समितीचे कर्मचारी त्रास देतात, तो त्रास बंद व्हावा अशा मागण्या निवेदनातून केल्या आहेत.

**कर्ज देण्याची मागणी**

तालुक्यातील विविध कार्यकारी संस्थांतर्फे शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करतांना तीन वर्षापासून नवीन सभासदांना कर्ज दिलेले नाही. जिल्हा बँकेने त्यांना कर्ज मंजुरी दिली नसल्याचे कारण सांगण्यात येते. त्यांना कर्ज द्या किंवा शेअर्सची रक्कम परत करा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतांना किसान संघाचे साहेबराव सोनवणे, दत्तू माळी, हिरेंद्र राजपूत, जयपाल राजपूत, उमेश पाटील, प्रशांत पाटील, विशाल वाणी आदि उपस्थित होते.

## मनपामार्फत बीज संकलन केंद्र सुरू

धुळे - मनपा मार्फत धुळे शहरात पर्यावरण बाबत नवीन महानगरपालिकेत वृक्ष विभागामार्फत बीजगोळे संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

मनपाच्यावतीने सिडबॉल निर्मिती उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे. हा उपक्रम दिनांक ३१ मे २०२६ रोजी आयुक्त निवास मयूर उद्यान मयूर कॉलनी देवपूर धुळे सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपक्रम सुरू राहणार आहे. यामध्ये शाळा महाविद्यालय विद्यार्थी सामाजिक संस्था लोक प्रतिनिधी मनपा कर्मचारी व अधिकारी तसेच धुळेकर नागरिक सहभागी होणार आहे.

### निधन वार्ता

**रविंद्र रासने**



धुळे, दि.२७- तालुक्यातील आनंदखेडे येथील रहिवासी रविंद्र हरी रासने(वय ८५) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते गिरीश रासने, कैलास रासने व योगेश रासने यांचे वडील होत.

**रो हाऊस विकणे आहे**

न्यु रो हाऊस 3 BHK मनपा हद्दीतील,वडेल रोड वलवाडी, धुळे.

9881922340

7387162340

जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी

**सेल्स प्रतिनिधी पाहिजेत**

नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.

प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित

आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी!

रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...

पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वत:ची दुचाकी असणे आवश्यक.

आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677 94227 92677

वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ

**वीर सावरकर अपार्टमेंट**

फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.

फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट

बुकिंगसाठी संपर्क

मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी

मो. 9405466937

इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)

मो. 9422789513

पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**पाहिजेत**

मेल सेल्समन - २ लेडीज सेल्समन - २ पाहिजेत.

१७२३, स्वर्ण पॅलेस, आग्रा रोड, बॉम्बे लॉज चौक, धुळे

02562 - 222428/ 233991

**अनारसे**

खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील नोंदणी आवश्यक आहे. अनारसा पिठ उपलब्ध आहे.

मदर्स किचन फूलवाला चौक,धुळे

9049902201 7887750864

**पाहिजे**

कंपाऊंडर, नर्स, किरकोळ कामासाठी मुलगा पाहिजे. पार्ट/फुलटाईम.

डॉ.आनंद गिंदोडिया श्री.धन्वंतरी हॉस्पीटल गल्ली नं.४, महात्माजी हॉटेल समोर

9112159675

**लेडीज सेल्समन पाहिजेत**

रेडिमेड कापड दुकानासाठी हुशार, अनुभवी लेडिज सेल्समन पाहिजे.

रुणवाल एम्पोरियम बॉम्बे लॉज जवळ, आग्रारोड, धुळे समक्ष भेटण्याची वेळ स.९ ते १२ पर्यंत

9422289284

**पाहिजेत**

इंडीयन ऑईल पंप लळींग पंपावर अनुभवी डिझेल/पेट्रोल वाटपासाठी मुले पाहिजेत. तसेच सफाईकामगार पाहिजे.

9822107518

**पाहिजेत**

FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर पाहिजेत. पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे

8767674975

**पाहिजेत**

हॉटेलसाठी मॅनेजर - ०१ कारागीर - ०१ वेटर - ०२ कॅप्टन - ०१ लावणे आहे.

8805589555

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय दत्त मंदीर देवपूर, धुळे मो. ८३२९२४९३८६

**2 BHK फ्लॅट विकणे आहे**

फ्लॅट नं.९, कोणार्क अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे

-: संपर्क :-

7517488159

**पाहिजेत**

मेडीकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली/ महिला पाहिजेत.

-: संपर्क :-

8483032975 9823716975

**पाहिजेत**

दुकानाच्या कामासाठी शिकाऊ माणुस चांगला पाहिजे.

श्रीकृष्ण इलेक्ट्रीकल मामलेदार कचेरीसमोर, धुळे

9421619402

**कुलिंग इंडिया की पहचान**

Symphony | Crompton

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर

BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

नियम व अटी लागू*

ak media- 238222

58 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०